navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 10 Apr, 2025

## Total Mention 3

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 1 | N/A | N/A | 1 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
|---|
| 2 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Mumbai Tarun Bharat | Young women want clean and safe Dharavi | Mumbai | 3 |

Mumbai Tarun Bharat • 10 Apr • Dharavi

# Young women want clean and safe Dharavi

| 3 • PG | 171 • Sqcm | 21433 • AVE | 17.73K • Cir | Bottom Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# तरुणींना हवी स्वच्छ आणि सुरक्षित धारावी

## 'धारावी सोशल मिशन'च्या निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मांडली मते; स्पर्धकांचा 'डीएसएम'कडून गौरव

**गायत्री श्रीगोंदेकर**

**मुंबई, दि. ९**

'नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड' अर्थात 'एनएमडीपीएल'चा सामाजिक उपक्रम असणाऱ्या 'धारावी सोशल मिशन'ने (डीएसएम) विद्यार्थ्यांनी आणि शिक्षिकांसाठी 'स्वप्नातील धारावी' या विषयावर निबंध स्पर्धा घेतली. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार, दि. ८ रोजी संपन्न झाला.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत धारावीतील २२ शाळांना सहभागी करून घेत एका अनोख्या निबंध स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेत धारावीतील विविध माध्यमांच्या शाळेतील मुली आणि शिक्षिकांनी सहभाग घेतला. २२ शाळांमधून एक हजार निबंध या स्पर्धेत जमा झाले. या निबंधातून दहा निबंधांना विशेष लेखनासाठी गौरविण्यात आले, तर सर्वोत्कृष्ट तीन निबंधांना गौरविण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ पत्रकार मृणालिनी नानिवडेकर, ज्येष्ठ पत्रकार अनुषा सुब्रमणियम, ज्येष्ठ पत्रकार राजेश विक्रांत, लेखिका रेखा निगम यांनी केले.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मास्टरप्लॅन बनविण्याच्या कामाने वेग घेतला आहे. अशावेळी धारावीकरांना नव्या धारावीत कोणत्या सोयी-सुविधा, उपक्रम आणि धारवीकरांच्या स्वप्नातील धारावी नेमकी कशी असावी, हे जाणून घेण्याचा प्रयत्न 'एनएमडीपीएल'कडून केला जात आहे. यासाठी 'एनएमडीपीएल'च्या माध्यमातून विविध स्पर्धा आणि उपक्रमाचे आयोजन धारावीत केले जात आहे. काही दिवसांपूर्वीच चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून ही स्वप्नातील धारावी साकारण्याची संधी 'डीएसएम'ने शालेय विद्यार्थ्यांना दिली होती.



छाया : रिध्देश कदम

**विजेते:**

**शिक्षक:**

१. सीमा नायडू, मॉर्निंग स्टार इंग्लिश स्कूल
२. गीतांजली यादव, श्रमिक विद्यापीठ
३. जेलिझा बालसिंग, धारावी टी. सी. मुन तामिळ शाळा

**विद्यार्थी:**

१. जोया शेख, गुरुनानक शाळा
२. झोया अन्सारी, धारावी टी. सी. मुन इंग्लिश स्कूल क्र. १
३. जेनिसा वेधराज, कानोसा हायस्कूल

**उपविजेते:**

१. भक्ती वाकोदे, संत कक्कया मार्ग मराठी शाळा क्र. १
२. अलीना खान, मॉर्निंग स्टार इंग्लिश स्कूल
३. प्राची प्रसाद, गुड शेफर्ड इंग्लिश स्कूल
४. दर्शना घोघारी, गुरु नानक नॅशनल हायस्कूल
५. झैनब आलम, धारावी टी. सी. मुन माध्यमिक उर्दू शाळा
६. सृष्टी वाघेकर, श्री गणेश विद्यामंदिर हायस्कूल (मराठी माध्यम) ७. कमली थेझियान, मॉर्निंग स्टार इंग्लिश स्कूल
८. लिशा शर्मा, मॉर्निंग स्टार इंग्लिश स्कूल
९. मुधुअंजना सेल्वापेरुमल, गुरु नानक नॅशनल हायस्कूल
१०. निशा दास, श्री गणेश विद्यामंदिर हायस्कूल.

सविस्तर व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

व्हिडिओ पाहा

### अत्यंत संवेदनशील विचार



या सगळ्या मुलांच्या मनात स्वच्छता, मुलींचे हक्क, त्यांची सुरक्षा हे सगळे या छोट्या छोट्या मुलींनी अत्यंत संवेदनशीलपणे लिहिले आहे. या मुलींचे विचार बघून मला खूप आश्चर्य वाटते आहे.

– **रेखा निगम,** परीक्षक तथा लेखिका

### धारावीबाबत लहान मुलींची स्वप्ने थक्क करणारी



हजारो निबंध आम्ही वाचले. या तरुणी आणि शिक्षिकांनी आपल्या विषयांतून 'धारावी पुनर्विकास प्रकल्पा'साठी प्रकर्षाने काही सूचना दिल्या आहेत. इतक्या निबंधात कोणीही या प्रकल्पाला विरोध केलेला नाही. प्रत्येकाला तिथे आर्थिक विकासाचे केंद्र असावे, स्वच्छता असावी, तिथे चांगल्या योजना असाव्या, वैद्यकीय सुविधा असाव्या आणि लवकरात लवकर हा प्रकल्प पूर्ण व्हावा, याची आस या मुलांना आहे.

– **मृणालिनी नानिवडेकर,** परीक्षक तथा पत्रकार

### शब्दांकित धारावी प्रत्यक्षात उतरेल

धारावीत सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण असेल, अशी आमच्या स्वप्नातील धारावी आहे. आम्ही शब्दांकन केलेली धारावी प्रत्यक्षात उतरेल, याची मला पूर्ण खात्री आहे.

– **सीमा नायडू,** शिक्षिका

### माझ्या स्वप्नातील धारावी

धारावीत महिलांसाठी सुरक्षित आणि स्वच्छ धारावी असावी, असे स्वप्न मी माझ्या नव्या धारवीच्यानिमित्ताने पाहात आहे.

– **कमली,** विद्यार्थिनी

### हे जगातील सर्वात सुंदर शहर असावे

माझ्या स्वप्नातील धारावी हे जगातील सर्वात सुंदर शहर असावे, असे वाटते. तिथे येणाऱ्या प्रत्येकाला वाटलं पाहिजे की धारावी कशी होती आणि आज किती सुंदर आहे.

– **सृष्टी,** विद्यार्थिनी

Dharavi Social Mission (DSM), a social venture of NMDPL, organized an essay contest across six schools in Dharavi, celebrating Women's Day. Over 1,000 entries highlighted dreams of a cleaner, safer Dharavi. Winners shared hopes for education, women's safety, and development, supporting the Dharavi Redevelopment Project's vision.

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | ThePrint | 1 lakh houses numbered as Dharavi survey in final stages, but 3 neighbourhoods p... | 11.3M |
| 2. | AlJazeera | 1 lakh houses numbered as Dharavi survey in final stages, but 3 neighbourhoods p... | N/A |